

## Descriptive Diwali Information:-

### १) अश्विन वद्य एकादशी. (रमा एकादशी)



दिपोत्सवाच्या प्रारंभी येणारी ही एकादशी म्हणजे रमा एकादशी. रमा म्हणजे लक्ष्मी. समुद्र मंथनातून पहिले रत्न निघाले ते म्हणजे लक्ष्मी. म्हणूनच आज कार्तिक स्नानानंतर लक्ष्मीची पूजा करुन उपवास केला जातो. आज विष्णुंना प्रिय अशा तुळशीला प्रदक्षिणा घालतात.या एकादशी पूजनाने सुखाच्या आड येणाऱ्या भावना विनाशासाठी प्रार्थना केली जाते. पापक्षालन करणारी इच्छा पूर्ती करणारी ही रमा एकादशी म्हणजे श्रीविष्णु आणि लक्ष्मीच्या पूजेचे व्रत.

### २)वसुबारस (गोवत्सद्वादशी)

समुद्र मंथनातून नंदा नावाची कामधेनू गाय निघाली. यादिवशी वासरू असलेली गाय (सवत्स गाय) यांची पूजा करून नैवेद्य देतात.




### ३)धनत्रयोदशी




धनत्रयोदशीनिमित्त सायंकाळी दागदागिने, द्रव्य, गणेश, विष्णू , लक्ष्मी, कुबेर, योगिनी, नाग, आणि द्रव्यनिधी आदींचे पूजन करून नैवेद्य दाखविण्याची पद्धत आहे. वसुबारस मागोमाग येणारा दिवाळी सप्ताहातील महत्त्वाचा सण म्हणजे धनत्रयोदशी.

*या दिवशी सायंकाळी घरोघरीं धनलक्ष्मीचे पूजन करतात. देवदेवतांचे पूजन झाल्यावर पायसचा (खीर) नैवेद्य दाखविण्यात येतो. या दिवशी 'यमदीपदान' करण्याची पद्धत आहे. अवेळी येणाऱ्या संकटांपासून सूटका व्हावी, यासाठी 'दीपदान' करण्याची श्रद्धा आहे. व्यापारीवर्गात 'धनतेरस' या नावाने धनत्रयोदशी साजरी केली जाते. पुढील आर्थिक वर्ष निर्वेध उलाढालींचे व्हावे या उद्देशाने बाजारपेठांत कुबेरपूजन करण्यात येते, अशी पद्धत आहे.

## ४) नरकचतुर्दशी (कारीट फोडणे) अभ्यंग स्नान




अश्विन महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्दशी तिथीला नरक चतुर्दशी म्हणतात. दिवाळीच्या एक दिवस आधी हा सण साजरा केला जातो म्हणून याला नरक चौदस, रूप चतुर्दशी आणि छोटी दिवाळी असेही म्हणतात. या दिवशी मृत्यूची देवता यमराजाची पूजा केली जाते. या दिवशी यमराजाची पूजा केली जाते आणि दक्षिण दिशेला यम नावाचा दिवाही लावला जातो. धार्मिक ग्रंथानुसार छोटी दिवाळीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाने नरकासुर या राक्षसाचा वध केला होता. ज्योतिष शास्त्रामध्ये या दिवसाचे महत्व सांगून काही उपाय देखील सांगण्यात आले आहेत, हे उपाय केल्याने जीवनात धन समृद्धी तर येतेच पण भय सोबतच पाप-दुःखापासून मुक्ती मिळते.

## ५)लक्ष्मीपूजन (अमावस्या)

लक्ष्मी पूजनाचे धार्मिक, आध्यात्मिक व व्यावहारिक मुल्य शब्दातीत आहे. इथे लक्ष्मी ही केवळ पैसा, धनप्राप्ती किंवा श्रीमंती याच अर्थाने अपेक्षित नसुन ती "श्री" या संकल्पनेवर आधारित आहे. श्री म्हणजे धनधान्य, ऐश्वर्य, संपत्ति, सत्ता, आरोग्य, समृद्धि, यश, प्रतिष्ठा, मानसन्मान, लोकप्रियता, दीर्घायुष्य या सर्वगुणसंपन्न अर्थाने येणे किंवा तिचे आगमन होणे अपेक्षित आहे.



या काळात शुचिर्भूतपणे श्रीमहालक्ष्मीच्या तसबिरीची किंवा मुर्तीची उत्तम चौरंगावर सुशोभित मांडणी करुन पूजन करावे. सोबत धन, सुवर्ण, बॅन्केची पासबुके, सर्टिफिकेट, नाणी यांचीही पूजा करावी. पूजा पंचोपचार केली तरी चालेल (म्हणजे स्नान, धुप, दीप, गंध आणि नैवेद्य) मनातील भाव हा कृतज्ञतेचा, श्रध्देचा असावा. बरेचदा श्रीलक्ष्मीपुजन करताना अनवधानाने श्रीविष्णूंचे स्मरण-प्रार्थना करणे राहुन जाते (श्रीमहालक्ष्मी तत्वाचं वैशिष्ठ्य म्हणजे जिथे विष्णूंचे स्मरण-प्रार्थना होते त्या ठिकाणी तिचा निवास रहातो. कारण ती विष्णुंशिवाय रहात नाही. त्यामुळे तिची पुजा अर्चना करण्याआधी विष्णूदेवांचे स्मरण करणे क्रमप्राप्त आहे हे विसरु नका. नुसते मानसिक स्मरण केले किंवा ॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

घरांतील वातावरण सुगंधित व प्रसन्न असावे.पुजनाचे उपचार हे तुम्ही तुमच्या इच्छेने व मनापासुन करावेत. पण लक्ष्मीपुजनासाठी काही प्रभावी मंत्र पुढीलप्रमाणे आहेत. त्यांचा जप प्रत्येक मंत्राचा किमान १०८ वेळा तरी पुजनप्रसंगी करावा. काही मंत्र तंत्रोक्त आहेत तर काही पुराणोक्त किंवा स्तोत्रातील आहेत. मंत्रजप हा शक्यतो पुजन झाल्यानंतर करावा. खाली दिलेल्या सर्वच मंत्रांचा जप करणं जमेल असं नाही पण निदान त्यातील दोन मंत्रांचा जप तरी प्रत्येकी १०८ वेळा करावा.जप झाल्यानंतर प्रार्थना करावी. आधीच्या पॅरेग्राफमधे जे गुण लिहिले आहेत त्यांची (धनधान्य, ऐश्वर्य, संपत्ति, सत्ता, आरोग्य, समृद्धि, यश, प्रतिष्ठा, मानसन्मान, लोकप्रियता, दीर्घायुष्य) प्राप्ती व्हावी अशी प्रार्थना करावी. नैवेद्य दाखवुन प्रसाद घरातील मंडळींना वाटावा.ज्यांना जमत असेल, येत असेल त्यांनी मंत्रजपानंतर "#श्रीसुक्त" किंवा "#महालक्ष्मी_अष्टक" यांचेही पाठ करावेत.

## ६) बलीप्रतिपदा दीपावली पाडवा (साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त) गोवर्धन पूजा (गोठा करणे)




दिपावलीचा चौथा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा... पाडवा! साडे तिन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त. कोणत्याही शुभकार्याची सुरूवात या दिवसापासुन करावी.हा दिवस बळीराजाचा स्मरणदिन म्हणुन देखील पाळला जातो. बळीराजा राक्षस कुळात जन्माला आला असला तरी तो अतिशय दानशुर होता. त्याची दानी वृत्ती एवढी विकोपाला पोहोचली होती की देवांना देखील या गोष्टीची काळजी वाटु लागली. सामान्य माणसं देवाच्या आधी देखील बळीराजाचे नाव घेउ लागली आणि त्यामुळे देवांच्या चिंतेत भर पडली. हे जर असेच सुरू राहीले तर देवाच्या अस्तित्वालाच धक्का पोहोचेल अशी काळजी देवांना वाटु लागल्याने बळीराजाचा बंदोबस्त करण्याची जवाबदारी सर्व देवांनी भगवान विष्णूवर सोपवली.

## ७) भाऊबीज (यमद्वितीया)

भाऊबीज हा हिंदुधर्मीय भाऊ बहीण साजरा करीत असलेला एक सण आहे हा सण कार्तिक शुद्ध द्वितीया या दिवशी असतो हा महाराष्ट्रीयन पद्धतीचा दिवाळीतला हा सहावा दिवस असतो या सणास हिंदीत भाई दूज असे




म्हणतात. तसेही दिवाळी हा सण आला म्हणजे आपल्या बहिणीला किंवा सासरी गेलेल्या मुलीला आपल्या घरी दिवाळीला आणण्याची प्रथा असते म्हणून बहिण भाऊ यांचा सण म्हणजेच भाऊबीज.

दिवाळीचे दिवस सर्वत्र आनंद व उत्साह चैतन्य भरभराट घेऊन येणारे असतात नैराश्याचे मळभ दूर सारून सर्वत्र चैतन्याचा सडा शिंपणारा हा सण प्रत्येकाला हवाहवासा वाटतो आणि म्हणूनच या सणाच्या आपण वर्षभर आतुरतेने वाट देखील पाहत असतो या सणाची जवळपास 15 दिवस शाळांना सुट्टी असल्याने बच्चे कपनीची तर मजाच असते त्यामुळे त्यांना या सणाची आगळीवेगळी गोड असते शाळांना सुट्ट्या, फटाक्यांची आतिषबाजी, फराळावर मारता येणार ताव त्यामुळे 15 दिवस नुसतं धुडगूस असते.




